2/6 copies

सकाळ, ८ नोव्हेंबर १९९३.

# पु. ल. : एक पुरुषोत्तम



पु.ल.पंच्याहत्तरी

सप्टेंबर १९५८, प्रिन्सेस स्ट्रीट, एडिंबरा. दुपारची वेळ.

ब्रिटिश कौन्सिलतर्फे आयोजलेल्या दौऱ्यात मी आणि माझे सहविद्यार्थी शशीकुमार चित्रे एडिंबराच्या संगीत महोत्सवासाठी केंब्रिजहून आलो होतो. संध्याकाळी कार्यक्रम असे, सकाळ एडिंबरा – दर्शनासाठी, तर दुपार मोकळी. आम्ही दोघे प्रिन्सेस स्ट्रीटवर विंडो शॉपिंगचा आनंद लुटत होतो. रस्ता देशी – विदेशी टूरिस्ट लोकांनी गजबजला होता. आम्ही मराठीत त्यांच्यावर टीका –टीप्पणी करत होतो.

"हॅलो! तुम्ही कुठले?" एकदम मराठीतून विचारलेला प्रश्न ऐकून आम्ही चमकलो. वळून पाहिले, तर एक भारतीय जोडपे स्मित करीत उभे होते.

□□


**'बटाट्याची चाळ' केंब्रिजमध्ये अवतरली, तेव्हा चाळकऱ्यांची जवळून ओळख झाली. चांगला पेटीवादक चांगला लेखकही असू शकतो, हे तेव्हाच कळाले.**

**जयंत नारळीकर**
**पुणे**

"मी देशपांडे – पु. ल. देशपांडे" पु. लं. नी स्वतःची व नंतर सुनीताताईंची ओळख करून दिली. नमस्कार चमत्कार झाल्यावर पु. लं. नी आठवण करून दिली.

"मी काही वर्षांपूर्वी बनारसला तुमच्या घरी आलो होतो. उत्कृष्ट पोह्यांची आठवण आहे." मग मला आठवले.... मी शाळेत असताना पु. ल. आमच्या घरी आले होते. नंतर विद्यापीठाच्या संगीत महाविद्यालयात त्यांचे पेटीवादन रंगले होते. स्वतः पंडित ओंकारनाथ ठाकूर यांनी आपल्या भरघोस भाषेत त्यांचे कौतुक केले होते.

आम्ही केंब्रिजमध्ये शिकतो हे कळल्यार पु. ल. म्हणाले, "आम्ही येणार आहोत ते विद्यापीठ पाहायला." तेव्हा आम्ही दोघांनी त्यांना केंब्रिजदर्शन घडवण्याची जबाबदारी घेतली.



'अपूर्वाई' वाचकांना 'P. L. in Cambridge' पुन्हा सांगण्याची जरूर नाही. पण त्यांच्या केंब्रिजभेटीतली एक हृद्य आठवण सांगाविशी वाटते. सगळीकडे फिरून आल्यावर चित्र्यांच्या खोलीत आम्ही जमलो. तेव्हा पु. ल. म्हणाले, "मी तुम्हाला एक चिंतन वाचून दाखवितो."

ते चिंतन पेटीवादनाप्रमाणेच रंगले. त्यातली पात्रे सजीव झाली आणि त्यांची जवळून ओळख व्हावी असे वाटले... कारण उत्तर भारतात वाढल्यामुळे मी पु. लं. ना लेखक म्हणून ओळखीत नव्हतो. चांगला 'पेटीवादक' चांगला लेखकही असू शकतो हे माहीत नव्हते. पुढे 'बटाट्याची चाळ' केंब्रिजमध्ये अवतरली तेव्हा चाळकऱ्यांची जवळून ओळख झाली.

विनोदी लिखाणाबद्दल मला विशेष आपुलकी वाटते. इंग्रजीत पी. जी. वुडहाउस आणि डब्ल्यू. डब्ल्यू. जेकब्सचा मी चाहता आहे. मराठीत चि. वि. जोशींच्या चिमणराव – गुंड्याभाऊंनी मला लहानपणापासून भुरळ घातली त्यांत आता बाबा बर्वे आणि कोचरेकर मास्तरांची भर पडली. पण उत्कृष्ट विनोदी लिखाण वाचायला जितके सोपे आणि जितक्या सहजगत्या मनोरंजन करते तितके ते लिहायला अवघड असते..... हे विधान खुद्द वुडहाउसने केले आहे. वुडहाउसची ओघवती इंग्रजी आपल्याला लिहिता आली असती तर? असे कितीतरी इंग्रजी वाचकांना वाटले असणार..... निदान मला तरी वाटते आणि तसेच मला वाटते पु. लं. च्या मराठीबद्दल

ज्याचे आपल्या विषयावर पूर्ण प्रभुत्व आहे असा वैज्ञानिक कठीण विषय श्रोत्याला समजेल इतका सोपा करून सांगू शकतो. पु. लं. च्या भाषेतून सहजगत्या उमटणारे विनोद अशाच प्रभुत्वाची जाणीव करून देतात.

* * *

'तुझे आहे तुजपाशी' आणि 'सुंदर मी होणार' पाहिले तेव्हा या विनोदी लेखकाच्या प्रतिभेचे आणखी पैलू दिसले. विनोदापासून

(पान ६ पाहा)



पु.ल.पंच्याहत्तरी

# पु. ल. : एक पुरुषोत्तम

(पान ३ वरून)

गांभीर्यापर्यंत नाट्यतंत्र हाताळण्याची किमया किती साहित्यिकांना जमते? आणि किती नाटककार स्टेजवर प्रभावी भूमिका वठवतात?

मी पु. लं. ची अशी एकच भूमिका पाहिली..... १९६६ मध्ये 'वाऱ्यावरची वरात' मध्ये. त्या वेळी ती गाजत होती आणि आज चित्रफितीवर पाहायला मिळते. जर आज सहजगत्या उपलब्ध असलेले 'व्हिडिओ' माध्यम त्या वेळी प्रचारात असते तर? तर पु. लं. चे अभिनयकौशल्य आज किती तरी वाचकांना प्रत्यक्ष पाहायला मिळाले असते. अनेक उच्चभ्रू व्यक्ती 'व्हिडिओ'कडे किंचित् उपहासाने पाहतात...... त्यांनी याची नोंद घ्यावी.

ती वाऱ्यावरची वरात एका वेगळ्या कारणामुळे स्मरणात राहील. १९६५-६६ मध्ये मी प्रसिद्धीच्या झोतात वावरत होतो व माझ्या संकोची स्वभावाला हा अनुभव फारसा मानवत नव्हता. त्यामुळे कुठल्याही जाहीर कार्यक्रमांना मी शक्य तो जात नसे..... व गेलोच तर स्वतःला शक्य तितका प्रच्छन्न ठेवून. पण त्या दिवशी पु. लं. ना माझ्या मामांनी (कै. गो. शं. हुजूरबाजार) 'अंदर बात' कळवली की मी नाटकाला येणार आहे. पु. ल. व सुनीताताईंनी मला श्रोतृवृंदातून शोधून काढले व कौतुकाने मध्यांतरात स्टेजमागे बोलावले. मी व माझी वाग्दत्त वधू (मंगला राजवाडे) त्यांना भेटून आलो. आमच्या केंब्रिज भेटीनंतरची ती पहिलीच भेट..... व मला एका आवडत्या साहित्यिकाला ( –आणि आता नटालाही!) स्टेजमागे भेटण्याचे थ्रिल अनुभवता आले.

पण मध्यांतरानंतर प्रयोगाआधी पु. लं. नी माइकवर जाहीर केले, "आम्हाला अभिमान वाटतो, की जयंतराव नारळीकर आजच्या प्रयोगाला हजर आहेत. मात्र, ते कुठे बसलेत ते सांगत नाही. कारण नाहीतर तुम्ही स्टेजकडे पाहण्याऐवजी त्यांच्याकडेच पाहत बसाल." ही घोषणा ऐकून मी कमालीचा अस्वस्थ झालो..... कारण चुपचाप येऊन नाटक पाहून जाण्याच्या माझ्या उद्दिष्टाला तडा गेला. पण मंगलाने मार्ग सुचवला : "तू नाटक संपण्यापूर्वी दहा मिनिटे आधीच हळूच घरी जा, म्हणजे गर्दी तुला नंतर घेरणार नाही." मी तसेच केले. नंतरची वरात टाळण्यासाठी नियोजित वधूला वाऱ्यावर सोडून घरी पळ काढला.

हे सर्व पु. लं. च्या नकळत होईल अशी मला आशा होती. पण कसचे काय? आमच्या ज्यूडासमामांनी ही वार्ता पण पु. लं. च्या कानावर घातली आणि वर माझी उपस्थिती जाहीर केल्याबद्दल त्यांनाच सुनावले : "भाई, तुम्ही लक्ष्मणरेषा ओलांडलीत."

* * *



मी परत भारतात स्थायिक झाल्यावर पु. लं. आणि सुनीताताईंच्या भेटीचे आणि गप्पागोष्टींचे योग आले..... पण आज ती संख्या अपुरी वाटते. त्यांच्या नर्मविनोदमय गप्पांचा आनंद वेळोवेळी लुटता आला असता, तर..... ? पण मुंबईच्या धकाधकीच्या जीवनात ते जमले नाही. पुण्यात ते अधिक शक्य झाले आणि महाराष्ट्राचे हे लाडके व्यक्तिमत्त्व अधिक जवळून पाहता आले.

पण साहित्य – संगीत – नाट्य आणि गप्पा यांच्यातून दिसणाऱ्या त्या बहुरंगी व्यक्तिमत्त्वाचे आगळेच दर्शन वाचकांना घडले. ते 'आहे मनोहर तरी' मधून. इंग्रजीत पत्नीला 'The Better Half' कां म्हणतात ते या पुस्तकावरून कळते. पु. लं. ची सर्जनशीलता निर्वेध चालू राहिली याचे कारण सुनीताताईंनी स्वतःच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाला आणि सर्जनशीलतेला बांध घालून. वेळोवेळी अप्रियता पत्करून त्यांचे केलेले सारथ्य. या सारथ्याने केवळ मागे बसलेल्या महारथ्याच्या सांगण्याबरहुकूम रथ चालवला नसून स्वतःच्या व्यावहारिक दृष्टिकोनातून त्याला वेगळी दिशाही दाखवली आहे आणि काही प्रसंगी त्या महारथ्याला व्यावहारिक गीता देखील सुनावली आहे.

पु. ल. 'पुरुषोत्तम' झाले यामागचे एक कारण त्यांना वेळोवेळी 'सुनीत' करणाऱ्या सुनीताताई.

दोघांनाही याप्रसंगी सादर अभिवादन!




स्नायूदुखीने बेजार?




स्नायूदुखी, पाठदुखीनं तुम्हाला, ब्रम्ह आठवलंय ना? का संधीवातानं जीव नकोसा केलाय? मग हे घ्या एक हुकमी औषध, नवीन मायोरब. शेकडो वर्षे, आयूर्वेदानं सिद्ध केलेली वनौषधी युक्त मलम. रसना, कुचला, ह्यांचा, प्रभावी संगम असलेलं. चोळताक्षणी त्वचेत शिरुन वेदनांचा संहार करण्याची क्षमता असलेलं.

स्नायूदुखी, सांधेदुखी, कंबरदुखी, संधीवातासारख्या विकारांपासुन चुटकीत आराम देणारं मायोरब. *(घरी असायलाचं हवं!)*

मायोरब. निसर्गाच्या मायेचा स्पर्शच जणू.

*"मायोरब देई त्वरीत आराम!"*






मायोरब मलम

हर्बल रेमेडिज (इं.) प्रा.लि. चे एक दर्जेदार उत्पादन

वितरक ● त्रिपाठी डिस्ट्रीब्यूटर्स, पुणे. ● लक्ष्मीसेन एजन्सीज, कोल्हापूर ● प्रथमेश मार्केटिंग सर्व्हीसेस, सातारा ● एम. के. एन्टरप्राइझेस, सांगली ● नीता मेडिकल्स, अहमदनगर ● विजय डिस्ट्रीब्युटर्स, नासीक ● अजय अ. जोशी, बारामती. ● नागदेव एजन्सीज, सोलापुर